# ।। तात्या को संवाद ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

## ।। अथ तात्या को संवाद लिखंते ।।

।। दोहा ।।

कहो समाधी देस मे ।। क्या सुख लील बिलास ।।
क्हे तात्यो गुरूदेवजी ।। कूण देस कुण बास ।।१।।

समाधी देशात काय सुख आहे?तेथे काय लिला–विलास आहे?तसेच तो देश कोठे आहे?हे गुरुदेवजी मला सांगा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना तात्यांने सांगितले. ।।१।।

।। कुंडल्या ।।

सुख तो मालम कुछ नही ।। क्यां कहुँ केसा होय ।
पण आणंद सुख बैकुंट का ।। दिल नही माने कोय ।।
दिल नही माने कोय ।। इसा सुख देखे जाई ।।
त्रपत व्हे जब हंस ।। फेर समाध लगाई ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। आ मालम हे जोय ।।
सुख तो मालम कुछ नही ।। क्या कहुँ केसा होय ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले की,समाधी देशात पोहचल्या–नंतर जे सुख मिळते ते सुख तुला कसे समजावू?त्या सुखाला मायेच्या शब्दांमध्ये वर्णन करता येत नाही.जगाला वैकुं ठाचे,मन व पाची विषयांचे सुख माहित आहे. समाधी देशाच्या सुखासमोर वैकुंठाचे सुख जराही माझ्या जीवाला आवडत नाही.मला वैकुंठाचे सुख समाधी सुखाच्या समोर तुच्छ वाटतात असे भारी सुख समाधी देशाचे आहे.वैकुंठाच्या सुखात अतृप्ती हे दु:ख असते तर समाधी देशाच्या सुखात तृप्ती हा आनंद असतो.तृप्त सुखांकरीता माझा हंस पुन्हा पुन्हा समाधी देशात सुख घेण्यास जातो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात असा तो तृप्त सुखाचा देश आहे.असे मला वैकुंठाच्या सुखांच्या समोर समाधी देशाचे सुख माहीत होते. ।।१।।

म्हामाई अर प्रगती ।। आगे जोत कहाय ।।
अजर लोक लग सुख की ।। निजमन कहे दिल माय ।।
निजमन कहे दिल माय ।। देस नव आगे होई ।।
वांहाँ की यां हाँ गम नाय ।। पुरष जाणे पण सोई ।
सुखराम कहे सुण तातिया ।। देस प्रख रे मांय ।।
म्हेमाई अर प्रगती ।। आगे जोत कहाय ।।२।।

समाधी देशात जाते वेळी त्रिगुटीच्या पुढे महामाया, प्रकृती, ज्योती तसेच अजरलोक लागतात.येथपर्यंतच्या सुखांची जीव गोष्ट स्वत:समजतो आणि याच्या पुढे आणखीही नऊ लोक आहेत.तेथील सुखांची माहिती येथे कोणत्याही मायावी ज्ञानी,ध्यानी,स्त्री–

पुरुषाला नाही.तेथील सुखांच्या गोष्टी तेच पुरुष जाणतील जे समाधी देशात पोहचले आहेत.या सर्व समाधी देशाच्या रस्त्याच्या देशाच्या सुखांची परीक्षा स्वत:ला करता येते. ।।२।।

त्रुगटी में सुख पांच हे ।। म्हेमा मेहेरी जाण ।।
माया के सुण लोक मे ।। देवत सुख बखाण ।।
देवत सुख बखाण ।। देस प्रगत के माही ।।
प्रेम रूप सब सुख ।। ओर दीसे कुछ नाही ।।
सुखराम जोत का लोक में ।। जोत तातिया माण ।।
त्रुगटी मे सुख पांच हे ।। मेहेमा मेरी जाण ।।३।।

हे तात्या,त्रिगुटीत शब्द,स्पर्श,रुप,रस,गंधाचे असे सुख आहे.महामायेत देवतांच्या लोकात जसे स्त्रीचे सुख आहे.प्रकृतीच्या लोकात दोन अति प्रेमी मित्रांमध्ये जसे आपसात प्रेम असते तसे प्रेमरुपी सुख आहे.तेथे सर्वांना आपसात अति प्रेम उमळते. याच्या व्यतिरिक्त आणखी काही तेथे समजत नाही.ज्योतीच्या लोकात झगमग ज्योतीचे सुख आहे. ।।३।।

अजर लोक ज्यां अलख हे ।। अणंद लोक मे नाँद ।।
ब्रजलोक मे ब्रम्ह हे ।। ज्हाँ चेतन का सवाद ।।
ज्हाँ चेतन का सवाद ।। इखर सो लोक कहावे ।।
वहाँ अनाहद नाद ।। खोल खिड़की जन जावे ।
सुखराम क्हे सुण तातिया ।। इखर लोक संमाद ।।
अजरलोक मे अलख हे ।। अणंदलोक मे नाद ।।४।।

ज्योतीच्या पुढे अजरलोक आहे.अजर लोकात अलख,अलख,अलख या ध्वनीचे सुख आहे.आनंद लोकात नाद ऐकू येतो.तो कानाला अतिप्रिय वाटतो.त्या आनंदलोकाच्या पुढे वज्रलोक लागतो.वज्रलोकात चेतनचा स्वाद आहे.म्हणजे स्त्री सुख आपोआप येते. वज्रलोकाच्या पुढे इखरलोक लागतो.त्या इखरलोकात अनहदनाद होत राहतो.तो अनहद नाद ऐकून सर्व लोक मस्त होऊन जातात.या अनहद नादचा तेथील लोकांना खुप सुख वाटते. या इखर लोकाहून पुढे जाण्याकरीता एक खिड्की लागते.ती खिड्की उघड्रून संत लोक पुढे जातात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,इखर लोकात गेल्यावर इखर म्हणजे न तुटणारी समाधी लागते. ।।४।।

सत्तलोक सत्तरूप हे ।। जिंग सब्द धुन होय ।।
आगे पूरण ब्रम्ह का ।। लोक कहावे दोय ।।
लोक कहावे दोय ।। फरक अेतो उण मांहि ।।

गळे नव तत्त की देहे ।। तेज सुख आणंद नांही ।।
सुखराम दुसरो लोक ओ ।। दसवो द्वार दे खोय ।।
फिर याँहा आयर ताँतिया । जनम धरे नही कोय ।।५।।

सत्तलोक सतरुप आहे.तेथे जिंग शब्दाची धुन ऐकू येते.याच्या पुढे दोन पुरण ब्रम्हचे लोक आहेत.या दोघांमध्ये असा फरक आहे.नवतत्त देह गळाल्याने दहाव्याद्वाराच्या आतील पुरण ब्रम्हमध्ये जीवामध्ये तेज राहत नाही.तसेच सुख आनंद काहीच राहत नाही.दहावेद्वार उघडल्यावर दुसऱ्या पुरण ब्रम्हचा लोक राहतो तेथे दिव्य शरीर मिळते. त्या देहात अनंत तेज असते.तसेच तेथे अनंत सुख जीवाला मिळतात.तो दहाव्या–द्वाराच्या पलिकडे पोहचलेला हंस परत आईच्या पोटात कधी येत नाही.म्हणजे मायेत कधी जन्म धारण करीत नाही. ।।५।।

कवत्त ।।

ओ सुण सुण नर ज्ञान ।। भेद हिरदे थिर कर हे ।।
सब सुरगुण बिध छाड़ ।। शिस सतगुरू पद धर हे ।।
वे चवरासी मांय ।। हंस कबहू नही जावे ।।
ना देवत के लोक ।। सुरग मेही नाय रहावे ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। वे नर नर ही होय ।।
खंड ब्रेहेमंड पिंड सोज के ।। लेत समाधी जोय ।।६।।

सगुणाच्या सर्व विध्या त्यागून जो मनुष्य समाधी देशाचे ज्ञान ऐकतो आणि सतगुरुला शिरावर धारण करुन तेथे पोहचण्याचा भेद ह्रदयात स्थिर करतो तो हंस समाधी देशात पोहचतो.तो हंस आईच्या गर्भात कधी जात नाही.८४ लक्ष योनीत जात नाही. हंस स्वर्गादिकाच्या कोणत्याही देवताच्या लोकात जात नाही.तसेच नरकादिक आणि भूत प्रेतादिकाच्या योनीत कधी जात नाही.तो मनुष्य सदाकरीता समाधी लोकात पोहचत नाही तोपर्यंत मनुष्याचा मनुष्यच होतो.आणि भेदाने खंड आणि ब्रम्हंड पिंडात शोधून खंड आणि ब्रम्हांड(३–लोक स्वर्गलोक ,मृत्युलोक ,पाताळलोक)(१३लोक–महामाया, प्रकृती,ज्योती,अजर,आनंद,वजर,इखर,अनहद,निरंजन, निराकार, शिवब्रम्ह, महाशुन्य, पारब्रम्ह)च्या पलिकडील समाधी देश म्हणजे सतस्वरुप लोकात पोहचतो. ।।६।।

तत्त रूपी गुरूदेव ।। परख सरणे वे आवे ।।
राम राम ओ पद ।। सिंवर घट नांव जगावे ।।
उलट पिछम के घाट ।। मेर इक बिसूं फोडे. ।।
गिगन मंडळ कूं छेद ।। आण त्रुगटी मन जोडे. ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। ब्रम्ह लोक वे जाय ।।

बज्रपोळ जन खोल के ।। धस गया तां माय ।।७।।

समाधी देशाची चाहना ठेवणारे हंस तत्तरुपी गुरुदेवाची पारख करुन त्यांच्या शरणात जातो.रामपदाचे रटन करुन रामाचे नाम घटात जागृत करतो आणि पश्चिमच्या मार्गाने उलटून मेरुदंडातील २१ मणी छेदन करुन मेरु पर्वत पोहचतो.मेरु पर्वताच्या पुढे त्रिगुटीत मन लावून त्रिगुटी पोहचतो.त्रिगुटीला त्यागून दहावेद्वाराच्या आधीच्या पुरण ब्रम्हच्या लोकात पोहचतो.पुरण ब्रम्हच्या पुढे वज्रपोल फोडतो,दहावेद्वार उघडतो आणि समाधी देशात पोहचतो. ।।७।।

कुंडल्या ।।

संत समाधी जाय के ।। पाछा आवे कांय ।।
ब्रम्ह सुख में गरक हुवा ।। तो क्या सुख थो जुग माय ।।
तो क्या सुख थो जुग माय ।। भेद या को मुज दीजे ।।
भ्रम हमारा भॉग ।। ब्रम्ह के सरणे लीजे ।।
क्हे ताँत्यो गुरूदेवजी ।। ओ भ्रम हे सब मांय ।।
संत समाधी जाय के ।। पाछा आवे कांय ।।८।।

तात्याने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,संत समाधी देशात पोहचल्या नंतर समाधी तोडून संसारात परत का येतो?संत सतस्वरुप ब्रम्ह सुखात गर्क झाल्या नंतर संसारात परत येतात तर समाधी देशात कोणते सुख नव्हते.कारणाने संत संसारात रमण करण्यास येतो हा भेद मला द्या.हा माझा भ्रम मिटवून द्या आणि मला सतस्वरुप ब्रम्हच्या शरणात घ्या असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगतो. ।।८।।

जळ मे डारे गाँगडी ।। तुरत गळे नई काय ।।
न्यारी करसूं स्याय के ।। फिर फिर लेत उठाय ।।
फिर फिर लेत उठाय ।। फेर पाछी ले डारे ।।
यूं दस पंधरे बार ।। निमक सब ही कुं गारे ।।
सुखराम क्हे सुण तातिया ।। यूं जन आवे जाय ।।
जळ मे डाऱ्यां लूण रे ।। तुरत गळे नही माय ।।९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात की,जसे महिला स्वयंपाक बनविते वेळी पिठात मिठ मिळवते.पिठ बारीक असते आणि मिठाचे मोठ मोठ खडे असतात ते पिठात मिळू शकत नाही.म्हणून महिला परातीत पिठ ठेवते आणि पिठाच्या मधोमध पाणी जमा राहण्याकरीता पिठात खड्डा बनवते.त्याच्यात पाणी टाकते आणि त्या पाण्यात मिठाचे खडे टाकते.ते खडे पाण्यात मुरवत राहते.ते खडे एकदम टाकताच गळत नाही.म्हणून हातांनी चुरुन चुरुन पाण्यात विरघळवत राहते.त्या पाण्यात मिठ

विरघळून मग त्या पाण्यात पिठ मिळवून पीठाचे उंडे बनविते जसे मिठाचे खडे पाण्यात लवकर विरघळत नाही त्या मिठाला परत परत पाण्यापासून वेगळे करुन हातात घेऊन चुरुन आणि पाण्यात टाकते.अशाप्रकारे आठ–दहा वेळा करुन त्या सर्व मिठाला विरघळवते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात.अशा तऱ्हेने संत समाधीतून संसारात येतात.संसाराचे प्रारब्ध भोगतात.परत समाधीमध्ये जातात परत संसारात येऊन राहिलेले प्रारब्ध भोगतात. एक दिवस सर्व प्रारब्ध संपून जातात आणि संत सदाकरीता जसे मिठ पूर्णत: पाण्यात मिळाल्यानंतर पाण्यातून बाहेर काढले जात नाही तसे संत समाधीतून जगात कधी येत नाही.समाधी देशात सदाकरीता पोहचून जातो आणि समाधी देशाचे सुख अखंडीत घेतो. ।।९।।

तुम अे भारी बातरे ।। क्युं बूझत हे आय ।।
तेरे उर क्या भाव हे ।। सो मुझ कहो सुणाय ।।
सो मुझ कहो सुणाय ।। अेक तो हर पद चाहिये ।।
अेक सुणण की बात । प्रख ते सो तिहुं कहिये ।।
सुखराम कहे सुण तातियां ।। दोय भाव जग माय ।।
तूँ अे भारी बात रे ।। क्यूं बूझत हे आय ।।१०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले की, तु ही अशी भारी गोष्ट मला कशाकरीता विचारत आहे?तुझ्या हृदयात काय भावना आहे?ते मला स्पष्ट सांग.एकतर मायेच्या पलिकडच्या हरचे पद पाहिजे की तुझ्या मनात माझी गोष्टी ऐकण्याची चाहना आहे का माझी पारख करु इच्छीतो हे मला सांग.हे तात्या,जगात हरपद प्राप्त करण्याची किंवा मायापदातच जसेच्या तसे राहण्याची असे दोन भाव आहे.तुझा काय भाव आहे हे मला सांग?।।१०।।

परख करे तूं संत की ।। हर मिलणे के काज ।।
तो आ पारख कीजिये ।। हरजन क्हे सो साझ ।।
हरजन क्हे सो साझ ।। फेर पारख आ कीजे ।।
ज्ञान ध्यान अर सीख ।। सुरत खेती पर दीजे ।
सुखराम क्हे सुण ताँतिया ।। छाड़ भ्रम को राज ।।
जे प्रखे तुं संत कूं ।। हर मिलणे के काज ।।११।।

जर तु रामजीला भेटण्याकरीता संताची परीक्षा करु इच्छीतो तर हरीजन जे सांगतात तशी साधना कर.हरीजन माया आणि ब्रम्हच्या पलिकडील सतस्वरुपाचे ज्ञान–ध्यान शिक आणि सुरत मायेतून काढून हरीजन जे सांगतात त्या साधनेवर दे.मायेत मोक्ष मिळेल,आवागमन मिटेल,काळ सुटेल आणि महासुख मिळेल हा भ्रम सोड आणि भ्रमात

टाकणाऱ्या मायेच्या साधना सर्व त्याग. ।।११।।

ध्यान समे सुण संत की ।। आ देहे थंडी होय ।।
मस्तक सेती अत रेहे ।। कर पारख कहुँ तोय ।।
कर पारख कहुँ तोय ।। नेण उलटर पट लागे ।।
अेक कळा आ केख ।। नांव सिष के घट जागे ।
सुख राम क्हे सुण तांतिया ।। अणभे कागद जोय ।।
ध्यान समे सुण संत की ।। आ देहे ठंडी होय ।।१२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्यास बोलले की,ध्यान करते वेळी संताचा देह थंड पडून जातो आणि मस्तक बर्फासारखे अति थंड पडते का?ही परीक्षा कर. ध्यानाच्या वेळी संताच्या डोळ्याचे पट उलट लागून जातात का?ही परीक्षा कर.त्यांची एक अनोखी कला ही पण पहा की त्यांच्या शरणात येणाऱ्या शिष्याच्या घटात समाधी देशात पोहचविणारे हरीनाम जागृत होते का?तसेच शिष्य समाधी देशात पोहचल्या–नंतर समाधी देशाची भयरहीत वाणी जगात बोलू लागतो का?ही परीक्षा कर. ।।१२।।

धिन धिन सेंसार में ।। हर मिलणे के काज ।।
पदवी छोड़े जक्त की ।। तीनु जग को राज ।।
तीनु जग को राज ।। मिलण की तजे उपाई ।।
पारब्रम्ह को ध्यान ।। भेद बूझे गुरू जाई ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। जे नर छोड़े राज ।।
धिन्न धिन्न संसार मे ।। राम मिलण के काज ।।१३।।

संसारात ते धन्य आहेत.ज्यांनी रामजीला म्हणजे हरला मिळविण्याकरीता जगातील राजा–बादशहा सारखी पदवी त्यागली आहे आणि सोबत तिन्ही म्हणजे स्वर्ग,मृत्यु, पाताळच्या लोकाचा राजा बनण्याचे त्रिगुणी मायेचे सर्व उपाय त्यागले आहेत आणि पारब्रम्ह सतस्वरुपात पोहचविणारे गुरुंच्या जवळ जाऊन पारब्रम्ह सतस्वरुपाचा भेद धारण केला आहे आणि पारब्रम्ह सतस्वरुपाचे ध्यान लावले आहे. ।।१३।।

कवत ।।

ब्रम्ह मिलण के काज ।। ब्रम्ह को ध्यान संभावे ।।
राज मिलण का ध्यान ।। ज्ञान सब ही ले बावे ।।
ओ सुण तजिया राज ।। गरज सजेनी काई ।।
कर रहयो फेर उपाय ।। राज की क्रिया जाई ।।
ज्हाँ लग ब्रम्ह न पावसी ।। कोटां करो ऊपाय ।।
सुखराम क्हे यूं तांतिया ।। भेद ध्यान के माय ।।१४।।

सतस्वरुप पारब्रम्ह मिळण्याकरीता सतस्वरुप पारब्रम्हचे ध्यान करतो आणि तीन लोकाचे राज्य मिळण्याचे ध्यान,ज्ञान सर्व दूर करतो तोच समाधी देशात पोहचेल.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात धरतीचे राज्य त्यागल्याने पारब्रम्ह सतस्वरुप प्राप्त करण्याची गरज पूर्ण होत नाही.हे तात्या,येथील राज्य तर तु त्यागले परंतु पुढे तीन लोकाचे राज्य मिळण्याचेच उपाय करुन राहीला आहे.या मायेचे राज्य मिळविण्यासारखे कोट्यावधी उपाय केले तरीही पारब्रम्ह सतस्वरुप पद मिळणार नाही. पारब्रम्ह सतस्वरुपाचे ध्यान करण्यात मायेच्या करण्यापेक्षा निराळा भेद आहे.।।१४।।

कुंडल्या ।।

च्यार ध्यान जप च्यार रे ।। बिस्न लोक कूं जाय ।।
एक ध्यान एक जप रे ।। रहे जक्त के माय ।।
रहे जक्त के माय ।। प्रमपद कदे न पावे ।।
तप क्रिया सब ज्ञान ।। भक्त सो जुग मे आवे ।।
सुखराम क्हे सुण तांतियाँ ।। समझ भेद इण माय ।।
च्यार ध्यान जप च्यार रे ।। बिस्न लोक कुं जाय ।।१५।।

चार प्रकारचे ध्यान,जपाने विष्णू लोकाचा वासी बनतो तर एक ध्यान जपाने जगात राजा बनतो.परंतु परमपदाचा वासी कधी बनत नाही.चार ध्यान,जप तसेच एक ध्यान जप सोड्हून अन्य तप क्रिया ज्ञान साधतात ते भक्त जगात राव सारख्या पदव्या प्राप्त करतात.अशा सर्व भक्त्यांमध्ये वेगवेगळे पराक्रम आहे. हा भेद समजा.अशाप्रकारे हरची भक्ती केल्याने जगातील राव,राजा विष्णूच्या देशाच्या पलिकडील महासुखाचा पारब्रम्ह देशाचा वासी बनतो हा भेद समज. ।।१५।।

सेवा पूजा जिझ रे ।। दया ध्यान अे चार ।।
अे फळसी संसार में ।। आगे नही बिचार ।।
आगे नही बिचार ।। हट तप जग मे आवे ।।
भेद तप नर साझ ।। सुरग के लोक सिधावे ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। याहां नही ब्रम्ह बिचार ।।
सेवा पूजा जिझ रे ।। दया ध्यान ये चार ।।१६।।

मायेची सेवा,पूजा,यज्ञ,दया तसेच मायेचे ध्यान हे चारी तीन लोकातच फळ देतील.हे चौथ्या लोकात पोहचण्याचे कधी फळ देणार नाही.हट्ट करुन तप केल्याने स्वर्गात जाईल याप्रकारे सर्व साधनांमध्ये ब्रम्ह मिळण्याचा भेद नाही.जगातच राहण्याचा भेद आहे. ।।१६।।

ज्ञान पाठ मंत्र जपे ।। अे सब हदका जाप ।।

सुरगुण पावे जनम धर ।। उलटा भुक्ते पाप ।।
ऊलटा भुक्ते पाप ।। प्रमपद कदे न पावे ।।
रेचक पूरक छाड़ ।। ध्यान भ्रुगुटी मे ल्यावे ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। यां सूँ मिले न आप ।।
ग्यान पाठ मंतर जपे ।। अे सब हद का जाप ।।१७।।

त्रिगुणी मायेचे ज्ञान आणि पाठ करणे,मंत्र जपणे हे सर्व हद्दीचे म्हणजे मायेत राहणारे जप आहेत.अशाप्रकारे सगुण भक्तीचे फळ येथेच संसारातच जन्म घेऊन मायेचे सुख घेण्याचे मिळेल.परंतु यासोबतच ८४,००,००० योनीचे महादु:खाचे भोग पडतील.या सर्व मायेच्या भक्त्यांनी काळाचे दु:ख रहीत महासुखाचे परमपद कधी मिळणार नाही. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,रेचक,पूरक तसेच कुंभक साधून ध्यान भृगुटीमध्ये चढवून लाखो वर्षापर्यंत भृगुटीत वास केल्याने ही महासुखाचे परमपद कधी मिळत नाही.(उदा.जांजुळी ऋषी)आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात की,सेवा,पुजा,यज्ञ,दया,ध्यान,हठयोग,तपस्या,ज्ञान,पाठ,मंत्र,योग,रेचक–पूरक साधून भृगुटीत स्थिर होणे याच्याने आपण म्हणजे पारब्रम्ह परमात्मा कधी मिळत नाही.कारण हे सर्व हद्दीचे म्हणजे आकाशाच्या खाली पोहचण्याचे पाज आहेत. ।।१७।।

ममंकार ओऊं जपे ।। सोहँ अजपे जाण ।।
अे पहुँचे बेकुंट मे ।। च्यारूं मत्त बखाण ।।
च्यारूं मत्त बखाण ।। जोग रहे जग के मांही ।।
त्राटक बदेही ध्यान ।। ब्रम्ह लग कदे न जाही ।।
सुखराम क्हे सुण तां तियां ।। अे दिल भेद पिछाण ।।
ममंकार ओऊं जपे ।। सोहँ अजपे जाण ।।१८।।

चारी मत म्हणजे,ममंकार,ओअम,सोहम तसेच अजप्पाच्या जपाच्या विधीने वैकुंठापर्यंत पोहचतो.त्याच्या पलिकडे परमपदात कधी पोहचत नाही.तसेच योग साधणारे योगी, त्राटक तसेच विदेही ध्यानी जगातच राहतात.पारब्रम्ह परमात्म्यापर्यंत कधी पोहचत नाही. हा भेद तुझ्या निजदिलात ज्ञानाने समज.।।१८।।

कवित ।।

पेलो ताटक ध्यान ।। दूसरो जोग कहावे ।।
तीजो बदेही ध्यान ।। मुन पर प्रथो लावे ।।
यामे साझन ध्यान ।। जप म्हे तोय बताया ।।
पाँचु इंद्राँ काज ।। करम आगे कऊं भाया ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। तीरथ ब्रत बिचार ।।

ध्यान ज्ञान जप तप रे ।। सब सुण माया का यार ।।१९।।

पहिले त्राटक ध्यान करणे,दुसरे योग विद्या साधणे,तिसरे विदेही ध्यान करणे तसेच चौथे मौन धारण करणे ह्या सर्व विध्या,साधन,ध्यान जप जे मी तुला समजविले ते पुढे पाची इंद्रियांचे विषय भोग प्राप्त करण्याचे कर्म आहेत.याच्यात पाची विषयांचे भोग कापून वैराग्य विज्ञान आनंद प्राप्त करण्याची रीत नाही आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला समजवित आहेत की,तिर्थ,व्रत,ध्यान,ज्ञान,जप,तप करणे हे मायेच्या पदातच ठेवण्याच्या साधना आहेत मायेच्या पलिकडील पारब्रम्ह सतस्वरुप मध्ये पोहचविण्याची साधना नाही. ।।१९।।

कुंडल्यो ।।

ब्रम्ह ध्यान बिन ध्यान सब ।। माया मिलण उपाय ।।
ब्रम्ह पेम बिन पेम सो ।। सब क्रमा की खाय ।।
सब करमा की खाय ।। नांव केवळ बिन सारा ।।
सब इद्याँ का भोग ।। करण कारण बिचारा ।।
क्रद सब्द के पेम बिन ।। प्रममोख नही जाय ।।
ब्रम्ह ध्यान बिन ध्यान सब ।। माया मिलण उपाय ।।२०।।

पारब्रम्ह सतस्वरुपाच्या ध्याना शिवाय जे दुसरे मायेचे सर्व ध्यान आहे ते मायेच्या प्राप्तीचे उपाय आहेत.परमपद प्राप्तीचे उपाय नाही.पारब्रम्ह सतस्वरुपाशिवाय मायेशी प्रेम करणे कर्मांची खाण प्रगट करण्यासारखे आहे.केवळ नामाशिवाय मायेचे सर्व उपाय इंद्रियांचे भोग प्राप्त करण्याची रीत आहे.कर्द शब्द म्हणजे इंद्रियांचे विषय-वासनांना कापणाऱ्या शब्दाच्या प्रेमाशिवाय परममोक्षास जाता येत नाही.हे तात्या तु मोक्षाला जाण्याकरिता इंद्रियांना तापवून राहिला आहे.परंतु तु क्रिया-साधना अशा करुन राहिला आहे ज्याच्याने पुढे परमपदात न जाता ३ लोकात इंद्रियांच्या विषय वासनांच्या भोगात अटकून राहशील. ।।२०।।

कवत ।।

सुभ असुभ बोहार ।। सरब इंद्याँ के तांई ।।
राव रंक क्या देख ।। सरब न्यारा जग मांई ।।
सब ही भुक्ते भोग ।। किसब भावे सो कीया ।।
यूं करणी जग माय ।। भोग आगे कूं जीया ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। यूं सब अेक उपाय ।।
प्रमपद मे तद मिले ।। सो बिध नही इण माय ।।२१।।

जगातील सगुणच्या शुभ भक्त्या म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेव तसेच अशुभ भक्त्या म्हणजे बळी मागणाऱ्या देवी-देवता अवतारांच्या भक्त्या ह्या सर्व सगुणाच्या भक्त्या इंद्रियांचे

सुख प्राप्त करण्याच्या भक्त्या आहेत.जसे जगात राजा आहे.तसेच रंक आहे.हे सर्व विषयांच्या भोगात रचमचलेले राहतात.रंकापासून राजापर्यंत हुन्नर म्हणजे धंदा वेगवेगळा करतात.परंतु सर्व इंद्रियांचेच भोग भोगतात.अशाचप्रकारे शुभ तसेच अशुभ करण्यारे वेगवेगळ्या आहेत.शुभ करण्यां इंद्रासारखे स्वर्गादिकात पाच विषयांचे भोग भोगतात.तर अशुभ करणी करणारे राक्षसादिक योनीत इंद्रियांचे भोग भोगतात.अशाप्रकारे सगुणाचे शुभ तसेच अशुभ भक्त्यांचे उपाय इंद्रियांचे सुख प्राप्त करण्याचे आहे.परमपद प्राप्त करण्याचे नाही.परमपद प्राप्त करण्याची विधी या विध्यामध्ये नाही.परमपद प्राप्त करण्याची विधी या सर्व विध्यांपेक्षा न्यारी आहे.ती विधी धारण केल्यानेच परमपदात जाता येते. ।।२१।।

प्रमपद को पेम ।। आप को आपी मांही ।।
प्रमपद को नांव ।। आप को आप जपाही ।।
प्रमपद को ध्यान ।। आप को आपी धारे ।।
प्रमपद सो उलट ।। आप कुं आपी तारे ।।
सुखराम तांतिया तत्त रे ।। यूं बिछडयो ज्यां जाय ।।
तन मे मन होय नांव संग ।। चड़े पिछम दिस माय ।।२२।।

परमपद म्हणजे सतस्वरुप म्हणजे ने:अक्षर हे अखंडीत आहे.हे आदिपासूनच हंसाच्या घटात आहे.त्रिगुणी माया ही हंसाच्या घटात कधी ही नव्हती आणि कधी ही प्रगटत नाही.ती मनाच्या पाची विषयांचे कर्म केल्याने पाची आत्म्यांना पुढे कर्माच्या रुपात जड्ते. परमपद आदि पासूनच हंसामध्ये आहे.म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात की,परमपदशी प्रेम स्वत:लाच स्वत:च्या हंसाच्या घटातून करावे लागते.परमपदाचे जे ने:अक्षर नाव आहे.हंसालाच हंसाच्या ह्रदयातून जपावे लागते आणि हंसाला स्वत:तील परमपदाशी ध्यान लावावे लागते.असे केल्याने हंसाच्या घटातील परमपदच हंसाला भवसागरातून तारतो.भवसागर तिरण्याकरीता बाहेरची मायेची विधी धारण करावी लागत नाही.हंस हंसाच्याच घटातील ने:अक्षर नामाशी निजमन लावतो आणि तो हंसाच्या घटातील निजनाम हंसाच्या मनुष्य तनाला खंड–ब्रम्हांड बनवितो आणि तो हंस आदि मध्ये ब्रम्हांडातून जसा खंडात आला तसा खंडातून पश्चिमच्या रस्त्याने २१ स्वर्गातून ब्रम्हांडात उलटतो आणि जेथून सुरवातीला वेगळा झाला होता अशा सतस्वरुपात पोहचतो. ।।२२।।

कुंडल्यो ।।

प्रमपद के मिलण की ।। दूजी नही उपाय ।।
चवदा तीनु लोक मे ।। फिर नर देखो जाय ।।

फिर नर देखो जाय ।। ब्रम्ह किण दिस ने पावे ।।
जिण पायो जब माय ।। सतगुरू भेद बतावे ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। करद शब्द कूं स्याय ।।
प्रमपद के मिलण की ।। दूजी नही उपाय ।।२३।।

परमपदाला प्राप्त करण्याची घटात कर्द शब्दाची विधी सोडून दिली तर दुसरी मायेची कोणतीही विधी कामी येत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात की,३ लोक१४ भवन(भुर, भुवर, स्वर, महर,जन,तप,सत,तल,अतल, वितल, सुतल, तलातल,रसातल,महातल)तसेच स्वर्गलोक,मृत्युलोक,पाताळलोक हे सर्व फिरुन पाहून घ्या.ज्यांनी ज्यांनी परमपदाची दाखवलेली विधी सोडून मायेच्या विध्या केल्या आहे ते सर्व ३ लोक १४ भवनात इंद्रियांच्या विषय वासनेत अटकले आहे.त्यांनी कोणी ही परमपद म्हणजे पारब्रम्ह सतस्वरुप प्राप्त केले नाही.परमपद म्हणजे पारब्रम्ह सतस्वरुप त्यांनीच प्राप्त केले आहे ज्यांनी हंसाच्या ध्यान करण्याचा सतगुरुंचा भेद धारण केला आहे. ।।२३।।

साखी ।।

अेक समे सुण राम के ।। आ बरती तन माय ।।
पारब्रम्ह के लोक मे ।। किस बिध मिलिये जाय ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला बोलले की,एकावेळी त्रेतायुगाचे राजा रामचंद्राच्या मनात पारब्रह्म सतस्वरुपाच्या लोकात जाण्याची चाहणा झाली.रामचंद्राने जगातील ज्ञानी,ध्यानी कडून ऐकले होते की,त्या लोकात मायेच्या कोणत्याही विधीने जाता येत नाही.मायेच्या विधीने जाता येत नाही तर मग मायेची विधी सोडून कोणत्या विधीने भेटता येते हे आपले गुरु वशिष्ठांना विचारु लागला.।।१।।

कवित्त ।।

रामचंद्र कूं देख ।। ज्ञान वाष्ट मुनि दीयो ।।
तुम ही ब्रम्ह बिचार ।। भ्रम काहे उर लीयो ।।
जेसे त्रंग कहाय ।। सूर सें किर्णा फूटे ।।
ज्यूं बादळ सूं बुंद ।। सरब न्यारी होय छूटे ।।
अेसे तुम उण ब्रम्ह सूं ।। न्यारा कहिये जाण ।।
रामचंद्र कूं तांतिया ।। वाष्ट मुनि केहे ताण ।।२४।।

रामचंद्राचा प्रश्न ऐकून वशिष्ठ मुनीने रामचंद्राला सांगितले की,हे रामचंद्र तुच सतस्वरुप ब्रम्ह आहे.तुझ्याशिवाय आणखी कोणी सतस्वरुप ब्रम्ह नाही आहे.तुझ्याशिवाय सतस्वरुप ब्रम्ह आहे हे विचार म्हणजे भ्रम तुझ्या उरात का उत्पन्न झाला?जसे समुद्र आणि

समुद्राची लहर हे दोन्ही वेग–वेगळे दिसतात.परंतु दोन्हीही समुद्रच आहे तसा तु आणि सतस्वरुप वेग–वेगळे दिसतात.परंतु तु आणि सतस्वरुप ब्रम्ह एकच आहे.जसे सुर्या पासून किरणे वेगळी फुटतात तसेच ढगापासून थेंब वेगळे होतात.तसे तु सतस्वरुप ब्रम्हपासून वेगळा आहेस.जसे सुर्य आणि सुर्याची किरणे सुर्यच आहे.तसेच ढग आणि ढगांपासून निघालेला तु तसेच सतस्वरुप ब्रम्ह एकच आहे.सतस्वरुप ब्रम्हपासून तु न्यारा नाही. ।।२४।।

इसी बिध को ज्ञान ।। ब्होत बिध दीयो आई ।।
तुमही ब्रम्ह बिचार ।। और दुबध्या नही मांई ।।
सोच करो मत कोय ।। जग का काम सुधारो ।।
तीन लोक म्रजाद बांध ।। राकस सब मारो ।।
सुखराम कहे सुण तांतिया ।। राम न माने कोय ।।
वाष्ट मुनि पच हार के ।। ब्रम्ह बतायो जोय ।।२५।।

वशिष्ठ मुनीने रामचंद्राला यातऱ्हेने खुप प्रकारच्या ज्ञानाने समजावले आणि रामचंद्राला तुच सतस्वरुप ब्रम्ह आहे हे सांगितले.तुझ्यात आणि सतस्वरुप ब्रम्हमध्ये दुविधा काहीच नाही म्हणजे फरक काहीच नाही आहे.म्हणून तु सतस्वरुप ब्रम्हच्या लोकात मिळण्याची काहीही फिकीर करु नको.तु सतस्वरुप ब्रम्हतून या संसाराच्या ज्या कामा करीता आला त्या कामाला पूर्ण कर.तु या तिन्ही लोकांची पालन–पोषण करण्याची विधी राक्षसांनी जी बिघडवली ती सुधार उत्पात करणाऱ्या सर्व दृष्ट राक्षसांचा संहार कर.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्यास बोलले की,वशिष्ठ मुनीची ही गोष्टी रामचंद्राने थोडीसीही मानली नाही.शेवटी वशिष्ठ मुनी पचून–पचून हारुन गेले तेव्हा रामचंद्रला वशिष्ठ मुनीने सतस्वरुप ब्रम्ह सांगितला. ।।२५।।

कुंडल्यो ।।

राम कहे गुरूदेव ने ।। यूं तो सब ही राम ।।
पाँच तत्त के बस पड़या ।। सो नहि पूरणधाम ।।
सो नहि पूरणधाम ।। ब्रम्ह तो असो होई ।।
सदा सुख आणंद ।। दुख मासो नही कोई ।।
मो मे तो सब बस रहया ।। सुख दुःख माया काम ।।
राम कहे गुरूदेव ने ।। यूं तो सब ही राम ।।२६।।

रामचंद्राने वशिष्ठ मुनीना सांगितले की,ज्ञान समजने बघितले तर सर्वच रामच आहे. मग तुम्ही मला ऐकट्यालाच राम कसे म्हणतात?जसे जगातील सर्व पाच तत्वाच्या वश पडले तसे मी ही पाच तत्वाच्या वश पडलो आहे.पाच तत्वाचा देह ही माया आहे.

म्हणून मी पूर्ण राम नाही.पूर्ण ब्रम्ह म्हणजे पूर्ण राम हा सदा सुख आनंदात राहतो.त्या दु:ख मासभरही राहत नाही.आणि माझ्यात विषयांचे सुख काळाचे दु:ख आणि कामवासना भरली आहे.म्हणून मी पूर्ण राम म्हणजे ब्रम्ह नाही आहे,मग तर सर्वच पूर्ण राम म्हणजे ब्रम्हच आहे. ।।२६।।

कवित ।।

ब्रम्ह सकळ घट माय ।। ब्रम्ह मे सब घट होई ।।
रामचंद्र तुम अेम ।। तुज बिन अेक न कोई ।।
दीजे भ्रम भगाय ।। ज्ञान कर देखो राई ।।
तीन लोक के माय ।। पुरष अेसो नही भाई ।।
सुखराम राम तब बोलिया ।। यूं तो सब सब मांय ।।
पूरणपद में घट नही ।। सो गुरू कहिये आय ।।२७।।

वशिष्ठ मुनी रामचंद्राला बोलले की,तो पूर्ण ब्रम्ह तर सर्व जीवांच्या घटाघटात आहे आणि त्या ब्रम्हमध्ये सर्व जीवांचे घट आहेत.अशाचप्रकारे रामचंद्र तु सर्व घटाघटात आहे आणि तुझ्यात सर्व घट आहे.तुझ्याशिवाय कोणी सतस्वरुप ब्रम्ह नाही हे राजपुत्रा, तुझा भ्रम मिटवून टाक.हे राजपुत्रा तु ज्ञान करुन पाहून घे की,तिन्ही लोकांमध्ये तुझा सारखा दुसरा कोणीही ब्रम्ह पुरुष नाही.तेंव्हा रामचंद्र वशिष्ठ मुनीशी बोलले की,असे तर सर्वच ब्रम्हच्या आतच आहे आणि तो ब्रम्ह ही सर्वामध्ये आहे.परंतु त्या सतस्वरुप ब्रम्हच्या पूर्ण पदात पाच विषयांचे मायावी घट नाही.त्या पूर्ण पदाचा भेद मला सांगा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला समजविले. ।।२७।।

कुंडल्या ।।

माया मांहि घट हे ।। घट मे माया होय ।।
पूरणपद मे घट नही ।। सो ब्रम्ह कहिये जोय ।।
सो ब्रम्ह कहिये जोय ।। राम बुझ्यो गुरू ताँई ।।
में तो सब मे होय ।। सरब हे मेरे मांई ।।
सुखराम क्हे प्रब्रम्ह में ।। तात्या घट नही कोय ।।
माया मांही घट हे ।। घट मे माया होय ।।२८।।

रामचंद्र बोलले की हे सर्व घट पाच विषयांच्या माया पदात आहे आणि या सर्व घटांमध्ये पाच विषयांची माया आहे.ज्या पूर्ण ब्रम्हमध्ये पाच विषयांच्या मायेचा घट नाही.त्या सतस्वरुप ब्रम्हची विधी शोधून मला सांगा.असे तर सर्वांमध्ये ब्रम्हरुपात मी आहे आणि सर्व माझ्यात जो ब्रम्ह आहे.त्याच्यात आहे.परंतु पारब्रम्ह सतस्वरुपात पाच विषय विकारांचा घट नाही आहे ते मला सांगा. ।।२८।।

पारब्रम्ह मे घट नही ।। ना पद हे घट मांय ।।
सो पदपुरण राम हे ।। सब जन क्हेतां जाय ।।
सब जन क्हेतां जाय ।। तीन गुण पाँचु नाही ।।
मोसुं अे गुरूदेव ।। निमष नही दूरा जाही ।।
राम कहयो गुरूदेव कूं ।। केवल राम बताय ।।
पारब्रम्ह मे घट नही ।। ना पद हे घट माय ।।२९।।

पारब्रम्ह सतस्वरुपात पाच विषयांच्या विकारी घट नाही आणि तो पारब्रम्ह सतस्वरुप पाच विषयांच्या विकारी घटात नाही.ते पद माया मुक्त पूर्ण राम आहे.असे सर्व संत सांगू गेले.तीन गुण रजोगुण,सतोगुण,तमोगुण हे ही त्याच्यात नाही आणि पाच इंद्रियांचे पाच विषय ही त्याच्यात नाही.त्या ब्रम्हमध्ये तीन गुण आणि पाची विषय नाही.परंतु माझ्यामध्ये तर हे तिन्ही गुण आणि पाची विषय डोळ्याची पापणी लवण्या इतका वेळही दूर राहत नाही म्हणून मी पूर्ण राम नाही.म्हणून हे गुरुदेवजी,मला पूर्ण राम म्हणजे ज्याच्यात मायेचा जराही अंश नाही असा कैवल्य राम सांगा. ।।२९।।

बाष्ट मुनि क्हे रामजी ।। तुम ही ब्रम्ह कुवाय ।।
ब्रम्हा बिसन महेस सुर ।। सब तुज बंदे आय ।।
सब तुज बंदे आय ।। देख प्राक्रम तुज माही ।।
तीनु लोक संभाल ।। पुरष असो कोऊ नाही ।।
तुम माया तुम ब्रम्ह हे ।। तुम ही आवो जाय ।।
बाष्ट मुनि कहे रामजी ।। तुम ही ब्रम्ह कुहाय ।।३०।।

वशिठ मुनीने रामजीला परत सांगितले की,सर्व तुलाच सतस्वरुप ब्रम्ह म्हणतात.ब्रम्हा, विष्णू,महेश आणि इंद्र धरुन सर्व देवता तुला सतस्वरुन ब्रम्ह समजून वंदना करतात. असा सतस्वरुप ब्रम्हाचा पराक्रम तुझ्यात आहे आणि तु ही तीन लोकान पाहून घे. तुझ्यासारखा पुरुष आणखी कोणी नाही.जगात ब्रम्हा,विष्णू,महादेवाचे काम अडते. तेव्हा तु ब्रम्ह होऊन माया बनतो आणि काम पूर्ण होताच तु परत सतस्वरुप ब्रम्ह बनून जातो.अशा प्रकारे तु पूर्ण ब्रम्हमधून मायेत येतो आणि मायेतून ब्रम्हमध्ये जाणे हे करत राहतो.।।३०।।

प्राक्रम तो सब राम कहे ।। माया को गुण होय ।।
क्हाँ कम जाफा इधक हे ।। म्हे नही मानु कोय ।।
म्हे नही मानु कोय ।। ब्रम्ह का अे लछ नाही ।।
तुम बेहेकावो मोय ।। झूट गुरू कहिये नाही ।।
सुखराम कहे सुण तांतिया ।। ज्ञान द्रष्ट कर जोय ।।

प्राक्रम तो सब राम कहे ।। माया को गुण होय ।।३१।।

रामचंद्र वशिष्ठला सांगतो पराक्रम हा मायेचा गुण आहे.सतस्वरुप ब्रम्हचा नाही.कोणामध्ये पराक्रम कमी आहे.तर कोणामध्ये जास्त आहे.असा माझ्यात पराक्रम जास्त आहे. म्हणून मी सतस्वरुप ब्रम्ह आहे हे मी मानत नाही.सतस्वरुप ब्रम्हचे गुण असे कमी जास्त होण्याचे नसतात.तुम्ही मला खोटे-खोटे सांगून बहकवू नका.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात की,तु ज्ञान दृष्टीने बघ कमी जास्त पराक्रम हा मायेचा गुण आहे.सतस्वरुप ब्रम्हचा गुण नाही हे समज.।।३१।।

काँहिक मांई इधक हे ।। काँहिक छुछम जाण ।।
माय सूं माया लडे ।। माया करे बखाण ।।
माया ही करे बखाण ।। स्हाय कर लेवे सोई ।।
माया उपज खप जाय ।। ब्रम्ह या मे नही होई ।।
सुखराम रामचंद्र तांतिया ।। इसी कही सुण ताण ।।
कांहिक मांही इधक हे ।। क्हां इक छुछम जाण ।।३२।।

कोणामध्ये पराक्रम जास्त असतो तर कोणामध्ये पराक्रम कमी असतो.जसे ब्रम्हा, विष्णू,महेश तसेच इंद्र पकडून ३३,००,००,००० देवता हे माया आहे जे या देवतांवर जलूम करुन राहीले ते राक्षस ही माया आहे.राक्षसांमध्ये या देवतांपेक्षा पराक्रम जास्त आहे. आणि माझ्यात या राक्षसांपेक्षा जास्त आहे म्हणून ब्रम्हा,विष्णू,महेश,इंद्र तसेच सर्व देवता माझी वंदना करतात आणि राक्षसांच्या जुलूमांपासून मुक्त होण्याकरीता माझा मायावी पराक्रमाचा आसरा घेणे चाहतात.जसे जगात एक दूसऱ्याशी लढतात. एक-दुसऱ्याची महिमा करतात आणि एक-दुसऱ्याची मदत करतात ती माया आहे.तो ब्रम्ह नाही म्हणजे मायाच मायेशी भांडते आणि मायाच मायेला मदत करते असे सर्व संत सांगतात.म्हणून जी जन्मते,खपते आणि मिटते ती माया आहे ब्रम्ह नाही.असे ताणून रामचंद्राने आपल्या गुरुस सांगितले असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले. ।।३२।।

पारब्रम्ह नही मारसी ।। नां यां करे स्हाय ।।
ना जाया ना जन्म सी ।। नही वे आवे जाय ।।
नही वे आवे जाय ।। सदा आनंद रस रूपी ।।
सावन पलटे अंग ।। इधक कम छांय न धूपी ।।
सुखराम ज्ञान मे सायदी ।। राम कही आ माय ।।
पारब्रम्ह नही मारसी ।। नां यां करे सहाय ।।३३।।

पारब्रम्ह हा कोणाला मारणार ही नाही आणि कोणाला मदत ही नाही करणार.पारब्रम्ह

आजपर्यंत कधी जन्मला ही नाही आणि पुढे ही जन्मणार नाही आणि पारब्रम्ह येत ही नाही जात ही नाही.पारब्रम्ह सदा आनंदरसरुपी आहे.त्याच्या आनंदाचा स्वाद तसेच स्वभाव कधी पलटत नाही.तो सावली किंवा उन्हासारखा कमी जास्त ही होत नाही. याची संतांच्या ज्ञानात साक्ष आहे.असे रामचंद्र गुरु वशिष्ठाशी बोलला. ।।३३।।

बाष्ट मुनि कहे रामजी ।। आ भ्यासी तुम मांय ।।
तो अब पूरणब्रम्ह की ।। कळ किमत कहुँ लाय ।।
कळ किमत केहु लाय ।। ब्रम्ह वे हे तुम मांही ।।
बजरपोळ के पार ।। देहे मे कहिये नाही ।।
सुखराम क्हे धिन धिन गुरू ।। सुणो तातिया आय ।।
बाष्ट मुनि क्हे रामजी ।। आ भ्यासी तुम माय ।।३४।।

वशिष्ठ मुनी रामचंद्राला बोलले की तुझ्यात ही गोष्ट भोसली आहे तर आता तुला त्या पूर्ण ब्रम्हची कला आणि हिकमत आणून मी तुला सांगतो.तो ब्रम्ह तुझ्या आतच आहे. परंतु पूर्ण रुपाने तो वज्रपोळाच्या पलिकडे आहे.पूर्णरुपाने वज्रपोळाच्या आत देहात नाही.हा भेद ऐकताच रामचंद्र आपल्या गुरुला वारंवार धन्यवाद देतो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला बोलले. ।।३४।।

चेतन माया ब्रम्ह सूं ।। सब ही उत्पत होय ।।
तां का तम अवतार हो ।। वां आगे हर जोय ।।
वां आगे हर जोय ।। तत्त वे ब्रम्ह कवावे ।।
सदा रूप आनंद ।। ताय भेदी जन गावे ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। वां हाँ अवतार न लोय ।।
चेतन माया ब्रम्ह सूं ।। सब ही उतपत होय ।।३५।।

ही सर्व चेतन माया आणि ब्रम्हची उत्पत्ती आहे.तु ही चेतन माया आणि ब्रम्हचा अवतार आहे.त्या माया ब्रम्हच्या पुढे हरला शोधून पहा.या माया ब्रम्हच्या पुढे जो हर दिसू लागेल तो तत्त म्हणजे मायेच्या पलिकडील ब्रम्ह म्हणतो.तो तत्तब्रम्ह सदा आनंदरसरुपी आहे.त्याला त्याचे भेदी संत भजतात.त्या तत्तब्रम्हात रामचंद्रासारखे मायावी अवतार किंवा जगासारखे मायावी लोक नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले.।।३५।।.

चेतन को सुण जीव हे ।। फिर पाँचुं जग माय ।।
मन निजमन रंग रूप ले ।। दाणु देव कुवाय ।।
दाणु देव कुवाय ।। सरब जग भाई होई ।।
अे आपस के मांय ।। सुख दु:ख लेवे दोई ।।

पारब्रम्ह तो यामे नही ।। ना वे आवे जाय ।।
चेतन को सुण जीव हे ।। फिर पाँचुं जग मांय ।।३६।।

राक्षस आणि देव या दोघांचा जीव हा चेतन स्वरुपाचा आहे.या दोन्ही जीवांना पाची आत्मा आहेत.दोन्ही जीवांना पाची तत्वांचा देह आहे.या दोन्ही जीवांमध्ये मन, निजमन,रंग,रुप ही माया आहे.अशाप्रकारे राक्षस आणि देव हे सर्व भाऊ-भाऊ आहेत.हे देव आणि राक्षस आपसात सुख दुःख घेतात-देतात.या दोघांमध्ये पारब्रम्ह सतस्वरुप नाही याच्यात पारब्रम्ह सतस्वरुप प्रगटत ही नाही आणि हे पारब्रम्ह सतस्वरुपात जात ही नाही. ।।३६।।

जीव ही मारे देह कूं ।। जीव ही देत अहार ।।
ओ तो झगड़ो जीव को ।। जीव ही जीते हार ।।
जीव ही जीते हार ।। बात साची आ होई ।।
पण तम सब पर राव ।। राम कहिये इम सोई ।।
बाष्ट मुनि क्हे रामजी ।। सुण जुग अेह बुहार ।।
जीवीं मारे जीव कूं ।। जीवी देहे आहार ।।३७।।

जीवच आहाराकरीता दुसऱ्या जीवाला मारतो.हा जीवच दुसऱ्या जीवाशी लढतो आणि जिंकतो व हा जीवच दुसऱ्या जीवाशी लढण्यात हारतो.हे भांड्ण जीवांचे आहे तरी ही वशिष्ठमुनी रामचंद्राला सांगतात की,खरी गोष्ट ही आहे की फक्त तुच या सर्व जीवांच्या वरचा राजा आहे. ।।३७।।

राम कहे गुरूदेव कूं ।। हो गुरू सुणो पुकार ।।
इण म्हेमा मे क्या मिले ।। सुख दुःख रेहे नित लार ।।
सुख दुःख रेहे नित लार ।। मोय पदवी नही भावे ।।
दीजे ब्रम्ह बिचार ।। संत भेदी जन गावे ।।
पारब्रम्ह बिन हंस ओ ।। फिट जीत्यो फिट हार ।।
राम कहे गुरूदेव कूं ।। हो गुर सुणो पुकार ।।३८।।

रामचंद्राने गुरुला सांगितले की,या मायेची महिमा होण्यास मला काय मिळेल? हे सुख आणि दुःख तसेच काम तर नेहमी माझ्या मागच्या मागेच लागले राहतात. ज्याच्याने हे सुख दुःख मिटतील असे भेदी संतांचे पारब्रम्ह विचार मला सांगा.पारब्रम्ह शिवाय हंस हारला तरी ही त्या हंसाला धिक्कार आहे आणि जिंकला तरी ही त्या हंसाला धिक्कार आहे. ।।३८।।

बाष्ट मुनि तब बोलिया ।। रामचंद्र सुण भेव ।।
पारब्रम्ह तब भाससी ।। आतर करसो सेव ।।

आतर कर सो सेव ।। आप आपी कुं जोवो ।।
राम राम ओ सब्द ।। अर्ध उर्ध बिच खोवो ।।
सुखराम कहे सुण तांतिया ।। अखंड बताई सेव ।।
बाष्ट मुनि तब बोलीया ।। रामचंद्र सुण भेव ।।३९।।

वशिष्ठ मुनीने रामचंद्रास सांगितले की,हे रामचंद्र,पारब्रम्ह प्रगट करण्याची चाहना आहे तर आतूर होऊन त्याची भक्ती तर आणि तो पारब्रम्ह स्वत:च्या हंसाच्या उरात शोध. राम-राम शब्द येत्या जात्या श्वासात धारोधार घे.अशाप्रकारे ही साधना अखंड कर या भेदाने पारब्रम्ह घटात प्रगटेल. ।।३९।।

कवत्त ।।

राम राम पद सिंवर ।। अर्ध उर्ध मन ल्यावो ।।
सुरत निरत धर माय ।। क्रद वो नांव जगावो ।।
वाँ के संग तुम होय ।। ब्रम्ह कूं देखो जाई ।।
पारब्रम्ह को चेन ।। द्वार दसवे के माई ।।
सुखराम कहे सुण तांतिया ।। आ बिधदी गुरू लाय ।।
रामचंद्र तब हर्ष के ।। बेठा ध्यान लगाय ।।४०।।

मुखाने राम-राम शब्दाचे स्मरण करतांना येत्या श्वासात तसेच जात्या श्वासात मन, सुरत आणि निरत लाव.या विधीने कर्म कापण्याचे कर्द म्हणजे ने:अक्षर शब्द कंठात प्रगट होईल.त्या ने:अक्षराच्या सोबत तु दहाव्याद्वारी पोहचशील दहाव्याद्वारात पोहचताच पारब्रम्हचे प्रगटण्याचे सर्व चैन-चमत्कार तुला दिसतील.।।४०।।

कुंडल्या ।।

उलट गिगन मे चड गया ।। लग्यो त्रुगटी ध्यान ।।
अब आनंद घट ऊपना ।। फिर नही बूझे ग्यान ।।
फिर नही बूझे ज्ञान ।। राज रीतां सब छाडी ।।
दिन दिन इधक सरूप ।। सुरत आनंद मे गाड़ी ।।
सुखराम कहे सुण तातिया ।। राम रहया सुख मान ।।
उलट गिगन मे चड़ गया ।। लग्यो त्रुगटी ध्यान ।।४१।।

वशिष्ठ मुनीने सांगितलेल्या भेदानुसार रामचंद्राने ध्यान लावले आणि त्या विधीने रामचंद्र २१ स्वर्गाच्या रस्त्याने गगनात उलटून त्रिगुटीत पोहचून गेला.त्रिगुटीच्या ध्यानात रामचंद्राला आनंद येऊ लागला.या आनंदात रामचंद्राने सर्व राज्य चालवण्याच्या रिती त्यागून दिल्या आणि दिवसें दिवस सुरत त्रिगुटीच्या सुखात गाडून दिली आणि सुख घेण्यात मगन होऊन गेला. ।।४१।।

छाड त्रुगटी ध्यान कूं ।। गया समाधी देस ।।

अब पारब्रम्ह कूं प्रसिया ।। अंतर रही न रेस ।।
अंतर रही न रेस ।। धिन धिन कहे गुरू के तांई ।।
अब मेरे आनंद ।। भ्रम राख्या नही मांई ।।
सुखराम राम सुण तांतिया ।। तज्या सकळ जग भेस ।।
छाड त्रुगटी ध्यान कूं ।। गया समाधी देस ।।४२।।

पुढे त्रिगुटीला त्यागून दहाव्याद्वारी समाधी देशात पोहचून गेला आणि पारब्रम्हचा प्रगट अनुभव करु लागला.दहाव्याद्वारात पारब्रम्ह मध्ये आणि रामचंद्रमध्ये रेष मात्र ही अंतर राहीले नाही.हा रामचंद्राला अनुभव होऊ लागला.रामचंद्र हा राजा होता.रामचंद्राला राजवी मायेच्या आनंदासमोर पारब्रम्हचा अलौकिक आनंद मिळत होत.म्हणून आनंद भेद देणाऱ्या गुरु वशिष्ठाचे वारंवार धन्य मानत होता.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगतात की,रामचंद्राने पारब्रम्ह प्राप्त केल्यानंतर जगातील मायेच्या सर्व विध्यांना त्यागून दिले आणि सव्र भ्रम त्यागून पारब्रम्हच्या आनंदच्या समाधीत मस्त होऊन गेला. ।।४२।।

अब सब कूं चिंता पड़ी ।। ओ कुण करसी राज ।।
रामचंद्र तो आप को ।। कर बेठो जुग काज ।।
कर बेठो जुग काज ।। लोक सब चालर आयो ।।
कहे रिषजी कूं आण ।। क्हा तम भेव बतायो ।।
सुखराम देव रिष कुं कहे ।। बिगड गयो सुर काज ।।
अब कहो सरणे कोण के ।। कहाँ हम जावां भाज ।।४३।।

आता ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,इंद्र पकडून सर्व देवी-देवतांना रावण राक्षसापासून स्वत:ला वाचविण्याची चिंता पडली.रामचंद्राने स्वत:चे तर कारज करुन घेतले.परंतु आमचे रावणाच्या तावडीतून सुटण्याचे कार्य झाले नाही.आता हे कार्य कोण करेल?या चिंतेने सर्व छोटे मोठे देवता वशिष्ठाजवळ चालत आले आणि वशिष्ठ मुनीला दु:ख सांगतांना म्हटले की,आपण रामचंद्राला पारब्रम्हाचा भेद दाखवून आनंदात जरुर मस्त करुन दिले.परंतु आमचे मात्र रावणाच्या जुलूमातून सुटण्याचे कार्य बिघडून गेले.आता आपणच सांगा आम्ही कोठे पळून जावे तसेच रावणाच्या जुलूमांपासून वाचण्याकरीता कोणाच्या शरणात जावे. ।।४३।।

बाष्ट मुनि चिंता करी ।। अब काहा कीयो जाय ।।
ब्रम्हा बिस्न महेस को ।। कारज अडियो आय ।।
कारज अडियो आय ।। तबे रिष दया बिचारी ।।
रामचंद्र तज ध्यान ।। बात अेक मान हमारी ।।

सुखराम तात्या रामजी ।। युँ थिर हूवा माय ।।
बाष्ट मुनि चिंत्ता करी ।। अब क्हा कियो जाय ।।४४।।

वशिष्ठ मुनीला ब्रम्हा,विष्णू,महेश तसेच सर्व देवतांचे दु:ख बघून या देवतांना रावणाच्या जुलूमांतून वाचविण्याकरीता काय केले पाहिजे याची चिंता पड्ली.ब्रम्हा, विष्णू,महेशचे कार्य अड्कून गेले.या चिंतेने वशिष्ठमुनीला दया आली.वशिष्ठ मुनीला ब्रम्हा,विष्णु,महेश तसेच देवतांना रावणापासून मुक्त करण्याकरीता दुसरा कोणी पराक्रमी पुरुष धरतीवर दिसत नव्हता.म्हणून गुरु वशिष्ठांना रामचंद्राने ध्यान तोड्णे हाच उपाय दिसला म्हणून ते रामचंद्राच्याजवळ येऊन रामचंद्राला ध्यान तोड्ण्याकरीता मनवले.रामचंद्र पारब्रम्हच्या ध्यानात गर्क होऊन गेला होता.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले. ।।४४।।

केहे रहे बचन बिचार रिष । राम समाधी खोल ।
बाष्ट मुनि रिष क्हे रहया ।। अेक बचन सुण बोल ।।
अेक बचन सुण बोल ।। देव सब ऊभा आई ।।
इँद्र सो करे पुकार ।। सुरां की गत न कोई ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। राम न बोल्या बोल ।।
केहे रहे बचन बिचार रिष ।। राम समादी खोल ।।४५।।

वशिष्ठमुनी रामचंद्राशी विचार करुन सांगू लागले अरे रामचंद्र समाधी तोड आणि माझ्याशी बोल हे सर्व देव येऊन उभे आहेत.३३ कोटी देवतांचा राजा इंद्र ही येऊन पुकार करुन राहीला आहे आणि हे सर्व देवता आपली काय गती होईल या चिंतेत पड्ले आहेत.कित्येक देवता रावणाच्या कैदेत आहेत ते कसे सुटतील?तसेच बाकी रावणापासून वाचलेले देवताही रावण सोड्णार नाही असे घाबरलेले आहेत.आदि सतगुरु सुखरामजी महाराज तात्याला सांगून राहिले आहे.की रामचंद्र पारब्रम्ह सतस्वरुपाच्या समाधीत इतका स्थिर झाला होता. ।।४५।।

राम समादी खोल के ।। कहयो गुरां सूं आय ।।
पारब्रम्ह का चरण तज ।। असुर न मारूं जाय ।।
असुर न मारूं जाय ।। अर्ज मानो गुरूदेवा ।।
ओ मोसर ओ ड़ाव ।। फेर कब पाऊं भेवा ।।
मेरो कारज बिगडे. ।। किसकी करूं सहाय ।।
राम समाधी खोल के ।। कही गुरां सूं आय ।।४६।।

शेवटी रामचंद्राने वारंवार गुरु वशिष्ठ मुनीच्या सांगल्याने समाधी तोड्ली अणि गुरु वशिष्ठला सांगितले पारब्रम्ह सतस्वरुपाचे चरण त्यागून मी राक्षसांना मारणार नाही ही

माझी तुम्हाला विनंती आहे.समाधी तोडेल तर पारब्रम्ह सतस्वरुपाचे सुख प्राप्त करण्याची वेळ म्हणजे डाव परत मी केव्हा प्राप्त करेल?माझी पारब्रम्हची समाधी त्यागल्यावर माझे कार्य बिगडते आहे.असे माझे काम बिघडवून मी दुसऱ्यांची मदत कशी करेल?।।४५।।

दया न कीजे झूट की ।। जिण संग बंधे पाप ।।
मेरो कारज सत्त कहुँ ।। काँय बिगाड़ो आप ।।
काँय बिगाड़ो आप ।। देव दाणू सब अेकी ।।
इनका अेक ही बुहार ।। ज्ञान कर लीजे देखी ।।
सुखराम राम सुण तांतियां ।। कही गुरूसे आप ।।
दया न कीजे झूट की ।। जिण संग बधे पाप ।।४७।।

रामचंद्र गुरु वशिष्ठांशी ज्ञानाने बोलले,ज्या सोबत पाप बांधले जाते.अशा खोट्यांवर दया करायला नको पाहिजे.मी जे पारब्रम्हमध्ये लीन होण्याचे कार्य करत आहे ते सत्य आहे आणि तुम्ही जे राक्षसांना मारण्याचे कार्य सांगून राहिले ते खोटे आहे.म्हणून तुम्ही माझे सत कार्य बिगडेल असे काही ही करु नका.देव आणि दानव हे सर्व एक माया आहे.यांचे जिंकणे आणि हारणे हाच एकमात्र व्यवहार आहे हे तुम्ही ज्ञानाने बघून घ्या.अशाप्रकारे रामचंद्र आपल्या गुरु वशिष्ठला पारब्रम्ह सतस्वरुपाशी समाधी तोडून पारब्रम्ह पासून दूर जाण्यास मानत नव्हता असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले. ।।४७।।

कवीत ।।

तीन लोक की रीत ।। सदा अेसी बिध होई ।।
क्षण जीते क्षण हार ।। सुख दु:ख मिटे न दोई ।।
व्हे बो मारो जाय ।। काहां कारज व्हे यांरा ।।
च्यार दिनाकी बात ।। उरे अे मरसी सारा ।।
सुखराम राम सुण तांतिया ।। कही गुरां सूं आय ।।
या झूटी बातां करणे मे ।। मत बो वो धे:माय ।।४८।।

तीन लोकात नेहमीपासून क्षणात जिंकण्याची आणि क्षणात हारण्याची रीत आहे. मायेतून निघून पारब्रम्ह पदाचे सुख प्राप्त करण्याची रीत नाही.याकारणाने तीन लोकातील जीवांचे सुख–दु:ख मिटत नाही.तुम्ही रावणाला मारण्यास सांगत आहात. याच्यापेक्षा देवतांचे सदाकरीता दु:ख मिटण्याचे कार्य कसे होईल?चार दिवसांची गोष्ट आहे.चार दिवसांत म्हणजे मागे–पुढे हे सर्व मारणारे किंवा मरणारे राक्षस तसेच देव मरुन मिटून जातील.याकरीता आपण मला या खोट्या गोष्टीत न लावता माझी पारब्रम्हची भक्ती सोडवू नका. मी दु:खांच्या दरीत पडेल.हे होऊ देऊ नका. असे रामचंद्र वशिष्ठ मुनींना

बोलला.हे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले. ।।४८।।

कुंडल्या ।।

बाष्ट मुनि हट चट पड़े ।। रावण मारो जाय ।।
पीछे हम नही छेड़ सा ।। दीजो ध्यान लगाय ।।
दिजो ध्यान लगाय ।। काज नही बिगडे. तेरा ।।
ओ परमारथ साझ ।। भाव उर हे सिष मेरा ।।
सुखराम राम ने तांतिया ।। यूं समझायो आय ।।
बाष्ट मुनि हट चङ पड़े ।। रावण मारो जाय ।।४९।।

वशिष्ठ मुनीच्या वारंवार समजावण्यावर ही रामचंद्र पारब्रम्हची समाधी त्यागून रावणाला मारण्याचे कबुल करत नव्हता.शेवटी वशिष्ठ मुनी गुरु या नात्याने जिद्द पकडून रावणाला मारण्यास रामचंद्रला विवश केले आणि समजावले की रावणास मारुन आल्यावर परत ध्यान लावून पारब्रम्हमध्ये लीन होऊन जा.मग आम्ही कधी पारब्रम्हचे ध्यान त्यागण्यास सांगणार नाही.रावणाला मारुन देवतांवर दया करणे हे परमारथ आहे.याच्याने तुझे कार्य बिघडणार नाही असे रामचंद्रला गुरु वशिष्ठने समजविले हे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले. ।।४९।।

राम कहे गुरूदेव कूं ।। किस कूँ मारूं जाय ।।
चवदा तीनु लोक मे ।। अेक पुर्ष रहयो छाय ।।
अेक पुर्ष रहे छाय ।। दूसरो दीसे नाही ।।
हातां कहो सरीर ।। कूण बिध काटयो जाही ।।
सुखराम ब्रम्ह जब भासियो ।। तब आ कही बजाय ।।
राम कहयो गुरूदेव कूं ।। किसकूं मारूं जाय ।।५०।।

रामचंद्र गुरु वशिष्ठ मुनीस विचारुन राहिला आहे की मी कोणास मारु?तुम्ही जो पारब्रम्हचा भेद दिला त्या ज्ञानाने मला ३ लोक १४ भवनात एकमात्र पारब्रम्ह सतस्वरुपच पसरलेला दिसून राहिला.पारब्रम्ह सतस्वरुपाशिवाय दुसरा कोणी पुरुष दिसत नाही. म्हणजे जो माझ्यात पारब्रम्ह प्रगटला तोच ३ लोक १४ भवनात राक्षस तसेच देवतां मध्ये दिसून राहिला.म्हणजे माझ्यात राक्षसांमध्ये आणि देवतामध्ये फरक दिसत नाही.मग मी राक्षसांना मारणे म्हणजे माझ्याच शरीराला आपल्या हाताने कापणे आहे.हे माझ्याने कसे शक्य आहे?असे रामचंद्राने घटात पारब्रम्ह प्रगट झाल्यावर आपल्या गुरुला बजावून बजावून जतविले असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला दाखवले. ।।५०।।

बाष्ट मुनि तब बोलिया ।। तीन लोक सच अेक ।।

पण सुभ असुभ बोहोर हे ।। सो घट भीतर देख ।।
सो घट भीतर देख ।। घेर मारग पर लावो ।।
आप आपको काम ।। ओर कूं कांही चावो ।।
सुखराम गुरा जब आ कही ।। सब सुर कारज लेक ।।
बाष्ट मुनि तब बोलियो ।। तीन लोक सच एक ।।५१।।

यावर गुरु वशिष्ठ मुनी शिष्य रामचंद्रास बोलले की ३ लोक १४ भवनात मात्र पारब्रम्ह सतस्वरुपच हे सत्य आहे.परंतु शुभ आणि अशुभ हे वेगवेगळे व्यवहार आहे.हे घटाच्या मध्ये ज्ञानाने बघितले तर शुभ आणि अशुभ हे आदि पासून वेगवेगळे आहेत किंवा एक आहे हे समज म्हणून अशुभ म्हणजे अत्याचारी रावणाचा नाश करण्याकरीताच तुझा जन्म झाला आहे.हे काम दुसऱ्याने करणे हे तु का चाहतो आहे?आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले.अशाप्रकारे गुरु वशिष्ठाने सर्व देवतांच्या कार्यांकडे बघून रामचंद्राला रावणास मारण्याचे समजविले. ।।५१।।

युं प्रचायर राम सूं ।। रावण मरायो जोय ।।
पारब्रम्ह कूं छाड़ कर ।। लियो काळ अघ रोय ।।
लियो काळ अघ रोय ।। राम परबस हुवा भाई ।।
माया बडी बलाय ।। ड्राव दे पकडे आई ।।
सुखराम क्हे सुण तांतिया ।। संत समाधी होय ।।
युं पर्चायर राम सूं ।। रावण मरायो जोय ।।५२।।

अशाप्रकारे रामचंद्रास समजावून रावणास मारण्यास लावले.रामचंद्राने पारब्रम्ह सतस्वरुपाला त्यागून वशिष्ठ मुनीच्या परवश होऊन काळ दोषाचे पाप करुन घेतले. आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी तात्याला सांगितले की माया समाधीत जाणाऱ्या संताला दगा करुन आपल्या डावात घेण्याकरीता मोठी चतुर आहे. ।।५२।।

।। इति तात्यां को संमाद संपूरण ।।